निशाणी क्र. २४ वरील आदेश
**(CNRNO.MHOS150007732020)**

वादी यांनी दावा दुरुस्ती करीता अर्ज दाखल केला आहे. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे वादींच्या घरालगत खडी केंद्र चालू केल्यामुळे आणि वादींच्या घरामध्ये, जमिनीमध्ये, बागायत पिकांमध्ये, विहिरीच्या पाण्यामध्ये तसेच अन्न, पाण्यामध्ये खडी मशीनची धुळ येऊन वादींना त्यांच्या जमिनीमध्ये काम करणे तसेच घरामध्ये राहणे आणि जेवणखान करणे अशक्य झाल्यामुळे घाईगडबडीने वादी यांनी दावा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे वादी हे अशिक्षीत असल्यामुळे व जास्त शिक्षण न झाल्यामुळे दावा दाखल करते वेळी आवश्यक माहिती वादी यांना देता आली नाही. दाव्यासोबत परिशिष्ट 'अ' नकाशा दाखल केला आहे. परंतु, त्यामध्ये दिशा चुकलेल्या आहेत. त्या शिवाय काही वर्णन स्पष्टपणे दिलेले नाही. दावा मिळकतीपैकी कोणत्या वादींची किती जमीन आहे याचाही दाव्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख करावयाचे राहुन गेले आहे. त्याचप्रमाणे वादींचे घर, विहिर आणि खडी मशीन यामधील अंतर अनावधानाने राहिले आहे. वादी आणि प्रतिवादी यांचे दरम्यान असलेल्या वादाचे निराकरण करणेकरीता प्रस्तुत अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दाव्यासोबत दाखल केलेल्या परिशिष्ट 'अ' मधील दिशा व वर्णन चुकीचे असल्यामुळे ते बदलुन त्या ऐवजी प्रस्तुत अर्जासोबत दिलेले परिशिष्ट 'अ' स्वीकारणे आवश्यक आहे. प्रस्तुत दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची असून दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करून अर्ज नाकारलेला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार अर्ज कायदेशीर तरतुदीच्या अनुषंगाने दिलेला नाही. दाव्यामधील कथनाद्वारे मान्य केलेल्या बाबी प्रस्तुत दुरुस्ती अन्वये वादी बदलु पाहत आहेत. वादी दाव्यामध्ये नवीन बाबींचा उल्लेख करत आहेत. प्रस्तुत दुरुस्ती अन्वये वादी नवीन

मागणी मागत आहेत. दुरुस्ती अर्ज विलंबाने दाखल करणेबाबत वादींनी कोणतेही कारण दिलेले नाही. दावा तुर्तातुर्त मनाई अर्जावरील युक्तीवादाकरीता ब-याच कालावधीपासुन प्रलंबीत आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे उपस्थीत होत असून त्याचे उत्तर निष्कर्शासह नोंदवत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अर्ज मंजूर होणेस पात्र आहे का ? | होकारार्थी. |
| २. आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

४. वादी यांचे विधीज्ञ श्री. आय. डी. शेख आणि प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री.एस. आर. काळे यांनी युक्तिवाद केला.

वादींचे विधीज्ञ श्री. शेख खालील न्यायनिर्णयावर विसंबुन आहेत.

***Mahendrakumar Bhagwatiprasad Agrawal Vs. Virendra Bhagwatiprasad Agrawal & Ors., 2015(1)Mh.L.J.,- The Hon'ble High Court held that,*** *amendment of pleadings are permissible even at appellate stage provided that such amendment does not cause injustice to other party and is necessary for determination of question in controversy.*

***Babarao s/o. Pandurangji Patil & Anr. Vs. Sau. Kalavati w/o. Rambhauji Sathawane & Ors., 2019(2)ALL MR 1.***

***Sumer Builders Pvt. Ltd. Vs. Sadhana Textiles Mills Pvt. Ltd. & Ors., 2015(1)ALL MR 795.***

***Mudra Salt and Chemical Industries Vs. Collector, Thane & Ors., 2001(3) Mh.L.J., The Hon'ble High Court held that,*** *the purpose and object of Order 6, Rule 17 of the Civil Procedure Code is to allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as may be just. All amendments should be allowed which are necessary for the purpose of determining the real question in controversy between the parties.*

प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री. काळे खालील न्यायनिर्णयावर अवलंबुन आहेत.

***M. Revanna Vs. Anjanamma (Dead) by L.Rs. And Ors., MANU/SC/0200/2019, The Hon'ble Supreme Court held that,*** *the proviso to Order VI Rule 17 of the Code of Civil Procedure virtually prevents an application for amendment of pleadings from being allowed after the trial has commenced, unless the Court comes to the conclusion that in spite of due diligence, the party could not have raised the matter before the commencement of the trial. The proviso, to an extent, curtails absolute discretion to allow amendment at any stage. Therefore, the burden is on the person who seeks an amendment after commencement of the trial to show that in spite of due diligence, such an amendment could not have been sought earlier.*

***Asian Hotels (North) Ltd. Vs. Alok Kumar Lodha and Ors.,2022(5) MLJ 710- The Hon'ble Court held that,*** *as per the settled proposition of law, if, by permitting plaintiffs to amend the plaint including a prayer clause nature of the suit is likely to be changed, in that case, the Court would not be justified in allowing the amendment. It would also result in mis-joinder of causes of action.*

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, दावा तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या युक्तीवादावर प्रलंबीत आहे. यावरुन दाव्यात अदयापपर्यंत चौकशी सुरु झालेली नाही. वादी आणि प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या वरील न्यायनिर्णयांचे अवलोकन केले. दाव्यामध्ये अदयाप चौकशी सुरु झालेली नसल्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेल्यावरील न्यायनिर्णयामधील निष्कर्ष प्रस्तुत अर्जाकामी लागु होणारी नाहीत.

याउलट वादी यांनी दाखल केलेल्या न्यायनिर्णयामधील निष्कर्ष प्रस्तुत अर्जाकामी लागु होणारी आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता, दावा निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. दाव्यामधील कथनांचे अवलोकन केले असता, वादी यांच्या कथनानुसार मौजे इनगोंदा येथील जमीन गट नं. १७९ ही वादी यांची दावा मिळकत असून दावा मिळकतीजवळ प्रतिवादी यांची गट नं. १९९ आणि गट नं. २०० हया मिळकती आहेत आणि सदर दोन्ही मिळकतीमध्ये बेकायदेशीर खडी केंद्र प्रतिवादी क्र. १ यांनी चालू केले असून सदर खडी केंद्राची धुळ वादी यांना हानीकारक असून त्याचा त्रास होत आहे त्याबाबत वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई ताकीद मागितलेली आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये एकुण सात वादी असून दावा मिळकत जमीन गट नं.१७९ आहे असा उल्लेख वादी यांनी दाव्यामध्ये केला आहे. तथापि, प्रत्येक वादी यांची दावा मिळकतीपैकी किती क्षेत्राची जमीन आहे याचा उल्लेख वादी यांनी दाव्यामध्ये केलेला नाही. त्यामुळे सुचीत दुरुस्ती अन्वये प्रत्येक वादी यांचे दावा मिळकतीपैकी किती क्षेत्र आहे याचा उल्लेख दाव्यामध्ये करणे आवश्यक आहे. दावा मिळकतीमध्ये कोणत्या प्रकारची पीके वादी घेतात याचा उल्लेख देखील दाव्यामध्ये करणे आवश्यक आहे. वादी यांच्या दावा मिळकतीमधील क्षेत्रामधून किती अंतरावर प्रतिवादी यांची खडी मशिन (खडी क्रेशर) आहे आणि सदर खडी मशिनमुळे वादी यांचे कोणत्या प्रकारचे नुकसान होते याबाबतचा उल्लेख देखील दाव्यामध्ये करणे आवश्यक आहे.

६. वादी यांनी दाव्यासोबत परिशिष्ट 'अ' दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी देखील कैफियतीसोबत परिशिष्ट 'ब' दाखल केले आहे. वादी यांच्या कथनानुसार परिशिष्ट 'अ' मध्ये दिशा चुकलेल्या आहेत आणि काही वर्णन स्पष्टपणे दिलेले नाही. वादी यांनी परिशिष्ट 'अ' मध्ये उत्तरेकडे पाटील यांची जमीन दर्शवलेली असून प्रतिवादी यांची मिळकत उत्तरेकडे दर्शवलेली नाही. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या परिशिष्ट 'ब' मध्ये उत्तरेकडे प्रतिवादी यांची जमीन गट नं. १९९ दर्शवलेली आहे. प्रस्तुत अर्जासोबत दाखल केलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये देखील वादी यांनी उत्तरेकडे गट नं. १९९ दर्शवलेला आहे. दाव्यासोबत दाखल असलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये वादग्रस्त खडी केंद्र

तसेच वादी यांचे घर, विहीर या बाबी स्पष्टपणे दर्शवलेल्या नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अर्जासोबत दाखल केलेले परिशिष्ट 'अ' दाव्यासोबत समाविष्ट करणे आवश्यक आहे. सुचीत दुरुस्ती अन्वये वादग्रस्त खडी मशिन गट नं. १९९ मध्ये इतर ठिकाणी बसवणेबाबत आदेशीत करणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे. सदरची सुचीत दुरुस्ती करणेस वादी यांना परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे नुकसान होणारे नाही.

७. सबब, सुचीत दुरुस्तीप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केलेस प्रतिवादी यांचे हक्क बाधीत होणार नाहीत. याउलट दाव्याचा अंतिम निर्णय होणेसाठी तसेच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेल्या वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी सुचित दुरूस्ती प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित आहे. सबब अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत असून प्रश्न क्र.२ बाबत खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रू.१,०००/- खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी सुचित दुरूस्ती आदेश झालेल्या तारखेपासून विहीत मुदतीमध्ये दाव्यामध्ये दुरूस्ती करावी आणि दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

Digitally signed by YADAV JYOTI NANASAHEB
Date: 2024.04.22 11:43:05 +0530

(श्रीमती. जे. एन. यादव)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
परंडा.

दिनांक – २०.०४.२०२४

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order/issues/evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. J. N. Yadav<br>Jt. Civil Judge, Senior Division, Paranda, District - Osmanabad. |
| Date | --- | 20/04/2024 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 20/04/2024 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 22/04/2024 |